ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal



## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | साहित्यिक गो. नी. दांडेकर यांचा जीवनप्रवास | सुप्रिया राजाराम गांवकर | 122-126 |
| 27 | मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती : जागतिकीकरणाच्या संदर्भात | प्रा.भरतकुमार भागाजी भालेराव | 127-131 |
| 28 | अमृता प्रीतम के 'पिंजर' उपन्यास में नारी चित्रण | अर्चना कडूबा पालकर | 132-134 |
| 29 | अधुरे देह की त्रासदी: किन्नर कथा | प्रा.डॉ.बाबासाहेब भुजाडे | 135-140 |
| 30 | संत तुलसीदास की प्रासंगिकता | डॉ. विष्णु गव्हाणे | 141-144 |
| 31 | ``महादेवी वर्मा और छायावाद`` | प्रा.खाडे विद्या बाबूराव | 145-147 |
| 32 | अलका सरावगी के कहानी संग्रह : दूसरी कहानी में वर्णित नारी | प्रीती अहिर | 148-152 |
| 33 | हरिवंशराय बच्चन के काव्य में प्रतीकात्मकता | डॉ.सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | 153-156 |
| 34 | संत तुकाराम का विद्रोह | डॉ. टाळके ए. बी. | 157-162 |
| 35 | सामाजिक कार्यकर्ता और समाज में अच्छा परिवर्तन करन में उसकी भूमिका | शिंदे प्रशांत हाबु | 163-167 |
| 36 | वृद्धावस्था : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. दिलीप कुमार सोनी | 168-174 |
| 37 | शितयुध्द कालखंड मे संयुक्त राष्ट्रसंघ की सफलता,असफलता एक परिक्षण | डॉ.सूर्यकांत माधवराव सांभाळकर | 175-180 |
| 38 | संत रविदास यांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार | प्रा.चव्हाण आर.ए. | 181-183 |
| 39 | महात्मा बसवण्णाच्या समतेच्या लढयातील पहिले बलिदान : वीरशरण हरळय्या | प्रा.डॉ.दत्ता पिलाप्पा हिंगमिरे | 184-187 |
| 40 | मराठेकालीन जमीन महसूल पध्दती एक अभ्यास | डॉ.देवकाते बी.एन. | 188-194 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेचे किंवा शासनव्यवस्थेचे मूल्यमापन | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 195-200 |
| 42 | सेनापती उमाबाई दाभाडे जीवन आणि कार्य | डॉ.सावंत के.डी. | 201-204 |
| 43 | कालखंडानुसार मोहोळ तालुक्याच्या इतिहासाचा | डॉ. सज्जन उध्दव पवार | 205-208 |
| 44 | आदिवासी कोकणीसमाजातील समाजसुधारक : श्री. बी. एस.कोकणी | डॉ. शशीकांत गोकुळ साबळे | 209-212 |
| 45 | **"लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे लोकोध्दारक कार्य"** | **प्रा.डॉ. सुनिल रजपूत** | 213-215 |
| 46 | प्रशासक हा तत्त्वज्ञ का असायला पाहिजे? (Why the Administrator Should be Philosopher) | चंद्रकांत प्ल्हाद सोनवणे | 216-220 |
| 47 | कृषी क्षेत्रातील राजर्षी शाहू महाराज यांचे | प्रा.डॉ.व्यंकटेश काळूराम मदनुरे | 221-223 |
| 48 | शिवकालीन ग्रामीण अर्थकारण | डॉ.मुळे नंदकिशोर कृष्णराव | 224-227 |
| 49 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान : शेतकरी आत्महत्या | गजानन संभाजी फुपाटे | 228-233 |
| 50 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार | प्रा.सुनिल मिरासे | 234-237 |
| 51 | कोरोना कालखंड आणि भारतीय महिलांची स्थिती | डॉ.प्रा.चांगदेव निवृत्ती मुंढे | 238-241 |
| 52 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ व प्रशासन व्यवस्था | डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे | 242-245 |
| 53 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कृषिविषयक दृष्टिकोन एक भौगोलिक अभ्यास | प्रा.कांबळे दयानंद सखाराम | 246-249 |

# शिवकालीन अष्टप्रधान मंडळ व प्रशासन व्यवस्था

**डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे**
सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि.बीड

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन हे आदर्श प्रशासन होते.या आदर्श प्रशासनाचे महत्वाचे पैलू म्हणजे त्यांच्या प्रशासन व्यवस्थेतील अष्टप्रधानमंडळ होय.शिवछत्रपतींचेअष्टप्रधानमंडळ हे यांच्या राज्यकारभाराचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जाते.शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती आपला कारभार अधिक कार्यक्षमतेने चालावा या हेतूने केली होती.हे अष्टप्रधान मंडळ त्यांनी राज्यभिषेकापूर्वीच निश्चित केले होते.राज्याभिषेकाच्या वेळी अष्टप्रधान मंडळात पूर्ण आकार देऊन त्यातील पदांना संस्कृत नावे दिली.शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या या अष्टप्रधान प्रशासन व्यवस्थेवरच स्वराज्याचा राज्यकारभार अवलंबूनहोता.

अष्टप्रधान मंडळातील प्रत्येकप्रधानाचेअधिकार व जबाबदाऱ्या निश्चित होत्या. शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारातील प्रशासन हे अष्टप्रधान मंडळ चालवत असे.अष्टप्रधान मंडळ जरी छत्रपतींचे प्रशासन चालवत असले तरी प्रशासनात सुव्यवस्था व पारदर्शकता असावीआणि प्रत्येक प्रदेशातील प्रशासनाची घडी व्यवस्थित राहावी यासाठी चार प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आलेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य या चार प्रशासकीय विभागात विभागलेले होते.

**संशोधनलेखाची उद्दिष्टे :**

१. शिवकालीन प्रशासन व्यवस्था अभ्यासणे
२. अष्टप्रधान मंडळ प्रशासनाची रचना अभ्यासणे
३. अष्टप्रधान मंडळाच्याकार्यपद्धतीचा अभ्यासकरणे

**शिवकालीन प्रशासकीय विभाग :**

छत्रपती शिवाजी महाराजांनीस्वराज्याचेप्रशासकीय सोयीसाठी चार विभागात विभाजन केलेले होते.पहिल्याप्रशासकीय विभागात राजधानी रायगड वत्या सभोवतालच्या प्रदेशाचा समावेश होता.या विभागाचा सरसुभेदार म्हणून मोरोपंत पिंगळे यांची नेमणूक केली होती.
दुसऱ्या प्रशासकीय विभागात पुणे ते धारवाड, कोपलपर्यंतच्याप्रदेशाचा समावेश होता.या प्रशासकीय विभागाचे सरसुभेदारम्हणून दत्ताजीपंत वाकनीस यांची नेमणूक करण्यात आली होती.

तिसऱ्या प्रशासकीय विभागात दक्षिण कोकण बेदनुर पर्यंतच्या प्रदेशाचा समावेश होता.कोकणातील किनारपट्टीचा या प्रदेशात समावेश होताया प्रदेशावर अण्णाजीदानोयांची सरसुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याच्या प्रशासकीय विभागातील चौथ्या विभागातमैसूर व तामिळनाडूतीलप्रदेशाचा समावेश होता.या प्रदेशावरहरडिमहाडिक यांची नियुक्ती करण्यात आलेली होती.

प्रत्येक प्रशासकीय विभागाला सरसुभा असे म्हटले जात असेतर त्यावर नियुक्त अधिकाऱ्याससुभेदार म्हटले जात असेसर सुभ्याची विभागणी अनेक सुभ्यातकेली जात असे.त्यावरील अधिकाऱ्याला सुभेदार असे म्हणत.सुभ्यातअनेक परगणे असतव त्यावरील अधिकाऱ्याला हवालदार असे म्हटले जाई. परगण्यात अनेक महाल असतत्यावरील अधिकाऱ्यालासहवालदार असे म्हटले जाईल.महालही अनेक गटात विभागलेले होतेत्यावरील अधिकाऱ्यासकमाविसदार असे म्हटले जाईप्रत्येक गटात अनेक खेळांचा समावेश असे लहान खेड्यात मौजे मोठे खेळण्यास कसबा बाजारपेठेच्या खेडयास पेठ असे म्हटले जात असेत्यावरील अधिकाऱ्यास पाटील असे म्हटले जाईत्याचप्रमाणेकुलकर्णीशेरेमहाजन हे वतनदार ही अधिकारी म्हणून काम पहात असत.

**अष्टप्रधान मंडळ :**

स्वराज्याचा कारभार सुरळीत चालावा यासाठी काळाची गरज लक्षात घेऊन कामकाजासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी आठ विभाग निर्माण केलेले होतेत्या प्रत्येक विभागावर एका प्रधानाची नियुक्ती केली होतीत्या व्यवस्थेला अष्टप्रधानमंडळ असे म्हटले जात असे.शिवकाळात अष्टप्रधान मंडळ हेराजाला जबाबदार होती. सर्व अधिकार मात्र शिवाजी महाराजांच्या हाती एकवटलेले होते.प्रधान यांची नियुक्ती किंवा पद मुक्ती ही महाराजांच्या मर्जीवर अवलंबून असे अष्टप्रधानमंडळ महाराजांना सल्ला देत असे व महाराजांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करत असे.शिवाजी महाराजांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणीकरण्यामध्ये अष्टप्रधान मंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या वेळी खालील अष्टप्रधान मंडळ निर्माण केले होते.

१.मुख्यप्रधान (पेशवा)
२. अमात्य(मुजुमदार)
३. सेनापती(सरनौबत)
४. सचिव (सुरणीस)
५. मंत्री (वाकणीस)
६. सुमंत(डबीर)
७. पंडितराव(दानाध्यक्ष)
८. न्यायधीश

अष्टप्रधान मंडळाचे कार्य

१.मुख्यप्रधान(पेशवा):

पेशवा अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान होता.मुख्यप्रधान हा इतर प्रधानांच्या कामावर देखरेख ठेवण्याचे काम करत असे. छत्रपतीच्या अनुपस्थितीत राज्याचा मुख्य अधिकारी म्हणून तो काम पाहत असे.राज्याची व राज्याची सेवा करणे, सरकारी कागदपत्रांवर

छत्रपतींच्या सही शिक्काच्याखाली प्रधानाला त्याचीसही वशिक्का करावा लागे.शिवाजीराजांच्या कार्यकाळात मोरोपंत पिंगळे हे मुख्यप्रधान होते. त्यांचा पगार 15000 होन एवढा होता.

२. अमात्य(मुजुमदार):

राज्याच्या उत्पन्नाचा व जमाखर्चाचा हिशोब तपासण्याचे कार्य मुजुमदार करत असे.एक प्रकारे आजच्या लेखापरीक्षकाचे काम हा प्रधान करत असे.राज्याच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे हे महत्त्वाचे काम त्यांना करावे लागेल नारोनिळकंठ व रामचंद्र या दोन बंधूची या पदावर नियुक्ती करण्यात आली होती त्यांचा पगार 12000 होनएवढा होता.

३. सेनापती (सरनौबत) :

हंबीरराव मोहिते यांची सेनापती म्हणून शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या वेळी नियुक्ती केली होती. सैन्याची भरती करणे, सैन्य संघटन करणे,शिस्तनिर्माण करणे, शस्त्र खरेदी करणे, युद्धात सैन्याचे नेतृत्व करणे, शौर्य गाजवणाऱ्या सैनिकांची नावे राजाला कळवणे, लुटीचा तपशील राजास देणे, जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावणे ही कामे सेनापतीला करावी लागत होती. सेनापतीचा पगार10000होन एवढा होता.

४.सचिव (सुरणीस) :

अण्णाजीदत्तो यांची सचिव पदी नियुक्ती करण्यात आली होती. स्वराज्याचा पत्र व्यवहार पाहणे. मालआणि परगण्याच्या खर्चाचा हिशोब तपासने,पत्रव्यवहारातीलदुरुस्ती करणे ही कामे सचिवाला करावी लागत असत. सचिवाचा पगार 10000होन एवढा होता.

५.मंत्री (वाकणीस) :

दत्ताजीत्रिंबक यांची मंत्री या प्रधान पदावर नियुक्ती करण्यात आली होती. याला वाकणीस असे म्हणत. दैनंदिन व्यवहाराची व दरबारातील प्रत्येक घटनेची नोंद ठेवण्याचे काम हा प्रधान अधिकारी करत असे. छत्रपतीकडे भोजन,भेट .इत्यादीसाठीयेणाऱ्यावर लक्षठेवून, दरबारात येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत इत्यादी महत्त्वाची कामे हा मंत्री करत असे. याचा पगार 10000होन एवढा होता.

६. सुमंत(डबीर) :

रामचंद्रत्रिंबक यांच्याकडे सुमंत हे प्रधान पद होते.शेजारील व परराज्यातील राजकारणाकडे याला लक्ष ठेवावे लागे.सुमंत प्रधान हा परराष्ट्र सचिव म्हणून काम करत असे. परराष्ट्र व्यवहार, विदेशी प्रश्नावर सल्ला देणे,परराज्यातील पाहुण्यांचे स्वागत करणे ही कामे डबीरालाकरावी लागत.डबीराचा पगार 10000 होणएवढा होता.

७. पंडितराव(दानाध्यक्ष) :

रघुनाथपंत राज्याचे पंडितराव होते. धार्मिक बाबतीत राजाला सल्ला देणे, विद्वानांचा सत्कार करणे,धर्मबाह्य आचरण करणाऱ्यास शिक्षा देणे,रुढी, धर्मशास्त्र यातील अर्थ सांगणे, विद्वान, धार्मिक स्थळे, ब्राह्मण यांना शासकीय अनुदान देणे ही कामे पंडितराव यांना करावी लागत असत.यांचा पगार 10000 होन एवढा होता.

८. न्यायाधीश:

निराजीरावजी हा स्वराज्याचा न्यायाधीश होता. राज्यातील न्यायदानाचे काम यांच्याकडे होते. फौजदारी व दिवाणी खटल्यातील न्यायदान करणे, खटल्याच्या बाबतीत सर्व पुराव्याच्या आधारे न्याय देण्याचे काम न्यायाधीश करत असे.न्यायाधीशांनीन्यायदानाचे कार्य निष्पक्षपाती पणे करावे अशी अपेक्षा त्यांच्याकडून होती.न्यायाधीशाचा पगार 10000 होन इतका होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या अष्टप्रधान प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास केला असता, असे लक्षात येते की, अष्टप्रधानमंडळ हे सल्लागार मंडळ होते. अष्टप्रधान मंडळातील प्रधान यांची पदे ही वंशपरंपरागत नव्हती. व्यक्तीच्या कर्तुत्वाचाआधारे ही पदे दिली जात असत.शिवकालीन अष्टप्रधानमंडळ व्यवस्था ही आजच्या मंत्रिमंडळाप्रमाणेच तात्कालीन प्रत्येक विभागाची जबाबदारी पार पाडत असे.

**निष्कर्ष :**

शिवकालीन अष्टप्रधान मंडळ प्रशासनाच्या अभ्यासातून खालीलप्रमाणेनिष्कर्ष निघतात

१. शिवकालीनअष्टप्रधानमंडळ हे सल्ला देण्याचे काम करत असे मात्र त्यांचा सल्ला छत्रपती वर बंधनकारक नसे.

२. अष्टप्रधान मंडळातील प्रत्येक प्रधानाची जबाबदारी वेगळी होती. अष्टप्रधान मंडळातील पदे गुणवत्तेच्या आधारावर भरली जात असत.

३. छत्रपती शिवाजी राजांनी प्रशासनाच्या सुविधेसाठी स्वराज्याचे चार विभागात विभाजन केलेले होते त्या विभागास सरसूभा असे म्हटले जाई.

४. अष्टप्रधान प्रशासनातील सर्व प्रधानांना रोख पगार दिला जात असे. आजच्या कर्मचाऱ्यांसारखा प्रत्येक महिन्याला पगार केला जात असे.

५. अष्टप्रधान मंडळातील सर्व प्रधानांना लष्करी कामगिरी बंधनकारक होती. छत्रपतींनी सोपवलेल्या कोणत्याही मोहीमेवर प्रधानाला जावे लागे.

६. अष्टप्रधान मंडळाचे कार्य हे आजच्या मंत्रिमंडळाच्या कार्याप्रमाणेच सामूहिक जबाबदारीचे असे. महत्त्वाची कागदपत्रे, सनदा, तह यावर छत्रपती बरोबरचसंबंधित प्रधानाचा शिक्का, सही असे.

७. अष्टप्रधान मंडळातील प्रत्येक प्रधानाला स्वतंत्र कार्यालय असे. प्रत्येक प्रधानाच्या कार्यालयात आठ कारकून काम करत असत.

८. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या अष्टप्रधान मंडळातील कार्यक्षम प्रधानाला मंडळातून काढून टाकत असत.

**संदर्भसूची:**

१.प्रा.अरुणा मोरे, मराठ्यांचा इतिहास, प्रगती प्रकाशन,पुणे,2000.

२.कुलकर्णीअ. रा. शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, 2004.

३.खरे ग.ह.मराठ्यांचा इतीहास,खंड-1कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,1984.

४.चिटणीस के. एस. मध्ययुगीन भारत,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,1979.

५.भावे वि.के.पेशवेकालीन महाराष्ट्र, अनमोल प्रकाशन, पुणे,1998.